# प्रेसनोट

दि. ३१/०७/२०२४

**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय अंतर्गत दिघी पोलीस स्टेशन येथील पोलीस हवालदार याचेवर लाच मागणी व स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व  गुन्हा नोंद क्रमांक | दिघी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | अमोल दशरथ जाधव, वय ४३ वर्ष, पद - पोलीस हवालदार, ब.नं. ७१७, नेमणुक – दिघी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,००,०००/- ( दोन लाख रुपये) |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | १,७०,०००/- (एक लाख सत्तर हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,७०,०००/- (एक लाख सत्तर हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | दि. १६/०७/२०२४ व दि. १८/०७/२०२४ रोजी. |
| सापळा दिनांक | दि. ३१/०७/२०२४ |

ठिकाण :- दिनांक ३१/०७/२०२४ रोजी १३.२० वा. चे सुमारास आंबा चौकच्या पुढे, आळंदी – विश्रांतवाडी रोड, वडमुखवाडी, ता. हवेली, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी चोविसावाडी, च-होली येथे बिल्डरकडून फ्लॅट खरेदी केला होता. तो फ्लॅट बिल्डरने तक्रारदार यांच्या परवानगीशिवाय परस्पर दुस-या व्यक्तीस विक्री केला आहे. म्हणून तक्रारदार यांनी बिल्डर यांचे विरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत दिघी पोलीस स्टेशन येथे तक्रारी अर्ज दिला होता. नमुद तक्रारी अर्जावरून बिल्डर यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यास मदत करुन पुढील योग्य ती मदत करण्यासाठी लोकसेवक पोलीस हवालदार अमोल जाधव याने तक्रारदार यांचेकडे २,००,०००/- रुपयाची लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक पोलीस हवालदार अमोल जाधव यानी वरील काम करुन देण्यासाठी पंचासमक्ष २,००,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, तडजोडीअंती १,७०,०००/- रुपयांची लाच मागणी करुन, लोकसेवक अमोल जाधव यांनी आज दि. ३१/०७/२०२४ रोजी तक्रारदार यांचेकडून रुपये १,७०,०००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारले म्हणुन त्यांचेविरुद्ध दिघी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पिंपरी, पुणे येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितीन विजय जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.